सत्यमेव जयते

# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे.

(महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागासवर्ग कल्याण विभागाची स्वायत्त संस्था)

सारथी

बालचित्रवाणी, गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

| CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in |
| --- | --- |


## 'सारथी' मध्ये विवक्षित कामांसाठी (Empanelment) महाराष्ट्र शासनाच्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमध्ये विवक्षित सेवा/कामासाठी, महाराष्ट्र शासनाच्या विवक्षित विभागांमधून तसेच मंत्रालयातील कोणत्याही प्रशासकीय विभागामधून सेवा निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची नामिका सूची (Empanelment) करण्याचे नियोजिले आहे. अर्जदार मंत्रालयातून किंवा निवडक विभागामधून अवर सचिव किंवा त्यांचेशी समकक्ष पदावरुन किंवा त्यापेक्षा वरिष्ठ स्तरावरुन सेवा निवृत्त झालेले असावेत.

सदर नामिकासूची (Empanelment) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल व विवक्षित कामांसाठी करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना याच शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील.

नामिकासूचीत समाविष्ट झाल्यामुळे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस काम मिळेल, याची कोणतीही हमी देण्यात येणार नाही. अधिकाऱ्याचा अनुभव व त्याचा वरील मुद्याबाबतचा अभ्यास याचा विचार करुन आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावधीकरीता वरील शासन निर्णयानुसार नियुक्तीबाबत गरजेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

विभागाची यादी, अधिक माहिती व ऑनलाईनद्वारे अर्ज करण्याची सोय http://www.sarthi-maharashtragov.in>NOTICEBOARD>EMPANELHR या संकेतस्थळावर दिनांक १२.०९.२०१९ पासून उपलब्ध होईल.

काही शंका, काही सूचना असल्यास sarthiempanelhr@gmail.com या ईमेल वर पाठवावे.

सदर विषयी भविष्यात कोणतीही माहिती/सूचना उपरोक्त लिंकवरच दिली जाईल. वृत्तपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी सारथीच्या उपरोक्त वेबसाईटवर NOTICE BOARD पाहत राहावे.

**ऑनलाईनद्वारे अर्ज करण्याची अंतिम तारीख - १०.१०.२०१९**

**डी. आर. परिहार**
**व्यवस्थापकीय संचालक, सारथी**

**Advt/EMPANELHR/10.09.2019/I**